GISTERED WITH RN AKSHARVAIDARBHI ISSN -0976-0296 POSTAL REG. NO.
Under No. 43658/84 Year-35 , Issue-6 , Sept.-2018 AMT/RNP/136/2018-20




प्रति,

पु-१/१२-१७/११-१८
श्री. शांताराम हिवराळे
'श्रद्धा हेरिटेज' बिल्डिंग ए/७, फ्लॅट ५,
महालक्ष्मी हाईट्स मार्ग, मोरवाडी,
पुणे-मुंबई हायवे, पिंपरी, पुणे-४११०१८

**प्रेषक**

संपादक अक्षरवैदर्भी,
जनसाहित्य भवन,
गणेश कॉलनी,
अमरावती.

ISSN-0976-0296

# अक्षरवैदर्भी

वर्ष-३५ अंक-६ १ सप्टें. २०१८



जनसामान्यांच्या साहित्य ※ संस्कृती ※ कलाभिरुची संवर्धनास वाहिलेली एकमात्र मराठी मासिक पत्रिका
रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर इंडिया नवी दिल्ली र.नं.४३६५८/८४
पोस्टल रजिस्ट्रेशन नं. ए.एम.टी./आर.एन.पी./ १३६/२०१८-२०
AKSHAR VAIDARBHI-ISSN 0976-0296

72

# अक्षरवैदर्भी

वर्ष-पस्तीस : अंक-सहा
श्रावण/भाद्रपद शके १९४०

संस्थापक संपादक
(स्व.) सुदाम सावरकर

**दि. १ सप्टेंबर, २०१८**

▮ कार्यकारी संपादक ▮
डॉ. सुभाष सावरकर

▮ संपादन साहाय्य ▮
डॉ.नीळकंठ गोपाळ मेंढे ▮ डॉ.निरंजनमाधव अंजनकर

एप्रिल २०१७ च्या अंकापासून 'अक्षरवैदर्भी' मासिकाची वार्षिक वर्गणी रु.५००/- करण्यात आली आहे. कृपया सहकार्य करावे.

प्रकाशक : जनसाहित्य साधना, जनसाहित्य भवन, गणेश कॉलनी, अमरावती-५.
(रजि.नं.महा./१६१६/अम.दि.२६-१०-१९८६)
फो.-०७२१-२५७७४१८, मो.९८६०४५१०७५
Email ID- subhashsudam@gmail.com
मुद्रक : नभ प्रकाशन, शाम नगर, कॉंग्रेसनगर रोड, अमरावती.

## अंतरंग

**लेख–**

- कबीरवाणीची जनप्रबोधकता–डॉ.कीर्ती राम पिंजरकर १९
- राष्ट्रसंतांचे तरुणांना आवाहन–प्रा.कु.सुनंदा किसनराव रेवसे ६७

**दोन शोधनिबंध–**

- ललित वाङ्मयाचे कलामूल्य–डॉ.सुभाष सावरकर ५
- १९९० नंतरच्या स्त्रीलिखित ललित गद्यलेखनाचे बदलते स्वरूप –श्रीमती कुलकर्णी ज्योती मधुकरराव ४२

**दोन कथा –**

- डुक–बा.स.जठार ९
- सत्ता–राहुल गोविंद निकम ५९

**व्यक्तिचित्र–**

- गोंदाबापू–प्रा.विठ्ठल ज. सदामते ५०

**दोन परीक्षणे –**

- 'दाखल खारीज' रसिकांच्या काळजात दाखल होणारी काव्यप्रतिभा –रोशनकुमार शामजी पिलेवान १३
- 'गुलमोहोर' आणि 'सूर्याच्या साक्षीने' सहजसुंदर कविता – कवी बबन धनावडे ३९

**ललित चिंतन –**

- वंद्य वंदे मातरम्– आनंद देशमुख २५

**अनुभवकथन –**

- अशीही एक रणरागिणी...?–कर्नल अरविंद वसंत जोगळेकर ३५

**जननिष्ठांची मांदियाळी –**

- कविता शाहीर प्रभाकरांची–प्रा.डॉ.शशिकान्त लोखंडे २९

**'अक्षरवैदर्भी' दिवाळी विशेषांक–२०१८ करिता दर्जेदार साहित्य पाठवा!** ७०

**दहा कविता–**

माती–एकनाथ उत्तम तेलतुंबडे (१७) तू येशिल तेव्हा ये !–मीनल येवले/उत्क्रांती–प्रा.आ.य. पवार/कुणाच्याही नकळत–विलास गावडे (१८) रुमणं–रवीन्द्र जवादे (२८) एकतेचे प्रतीक–अरुणकुमार यादव/सांज–वेणा–विनय मिरासे 'अशांत' (३७) अंधश्रद्धा गाडा–प्रा.धनराज खानोरकर/ओलसावली–गोविंद मोतलग (३८) बेचैन स्पंदनांच्या चाहुली–वैशाली मुंगोले (६६)

शोधनिबंध

# ललित वाङ्मयाचे कलामूल्य

**डॉ.सुभाष सावरकर**
जनसाहित्य भवन, गणेश कॉलनी, अमरावती–५

(मागील अंकावरून)

**–तीन –**

काही आधुनिक साहित्यमीमासकांनी सर्व ललितकलांना साधारण असलेले लयबद्धता हे कलामूल्य पुरस्कारले असून नवसाहित्याचे पक्षधर कवी बाळ सीताराम मर्ढेकर यांनी 'लय' हा साहित्यातील सौंदर्याचा तसाच वाङ्मयीन श्रेष्ठतेचाही निकष मानला आहे. त्याचबरोबर संवाद, विरोध आणि समतोल हे लयाचे तीन प्रकारही हिरिरीने पुरस्कारले आहेत.

समकालीन साहित्याभ्यासकांच्या मतानुसार संवेदनांचा लय हा केवळ संवेदनाधिष्ठित कलांच्या बाबतीत प्रकर्षाने लागू करता येईल. मर्ढेकरांच्या भूमिकेनुसार अर्थाधिष्ठित अशा वाङ्मयकलेच्या संदर्भात देखील लयतत्त्व लागू असून भावनार्थाचा (अर्थात् भावभारित अर्थांच्या आंदोलनांचा) लय हा येथे प्रस्तुत ठरतो. म्हणजे भावनात्मक अर्थांची आंदोलने लयपूर्ण उतरणे हे वाङ्मयकृतीच्या कलात्मक सौंदर्याचे एकमात्र गमक ठरते.

मर्ढेकरांच्या लयसिद्धान्तावर केवळ वाङ्मयकलेच्याच नव्हे तर अन्यही कलांच्या अभ्यासकांनी आक्षेप नोंदविले आहेत. माधव आचवल, संभाजी कदम हे चित्रकला विमर्शक, अशोक केळकरांसारखे भाषाशास्त्री तसेच गंगाधर गाडगीळ, रा.भा.पाटणकर, प्रभाकर पाध्ये, द.ग.गोडसे, शरच्चंद्र मुक्तिबोध, नरहर कुरुंदकर आदि समकालीन साहित्यविमर्शक/विचारकांनी मात्र मर्ढेकर पुरस्कृत साहित्यसौंदर्याच्या लयसिद्धान्ताची गांभीर्याने दखल घेतली असून २० व्या शतकाच्या उत्तरार्धात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी–अशा वाङ्मयाच्या लालित्य/सौंदर्याकडे पाठ फिरविलेल्या साहित्य चळवळींनी मराठी साहित्याचा परिसर पुरता ढवळून काढलेला असतानाही या शतकाच्या अंतापर्यंत लयसिद्धान्ताची चर्चा तेवढ्याच चिवटपणे सुरू होती. त्याचवेळी हे देखील लक्षात घ्यावे लागते की आधुनिक जगातील रूपवादी/कलावादी/आकृतिवादी साहित्यसमीक्षकांनी तो उचलून धरला असला तरी प्रत्यक्ष समीक्षाव्यवहारात आजवर लयसिद्धान्त फारसा उपयुक्त/प्रभावशाली ठरलेला नाही. मर्ढेकरांचे समकालीन मीमांसक

# अंतरंग


लेख–

- कबीरवाणीची जनप्रबोधकता–डॉ.कीर्ती राम पिंजरकर १९
- राष्ट्रसंतांचे तरुणांना आवाहन–प्रा.कु.सुनंदा किसनराव रेवसे ६७

दोन शोधनिबंध–

- ललित वाङ्मयाचे कलामूल्य–डॉ.सुभाष सावरकर ५
- १९९० नंतरच्या स्त्रीलिखित ललित गद्यलेखनाचे बदलते स्वरूप –श्रीमती कुलकर्णी ज्योती मधुकरराव ४२

दोन कथा –

- डुक–बा.स.जठार ९
- सत्ता–राहुल गोविंद निकम ५९

व्यक्तिचित्र–

- गोंदाबापू–प्रा.विठ्ठल ज. सदामते ५०

दोन परीक्षणे –

- 'दाखल खारीज' रसिकांच्या काळजात दाखल होणारी काव्यप्रतिभा –रोशनकुमार शामजी पिलेवान १३
- 'गुलमोहोर' आणि 'सूर्याच्या साक्षीने' सहजसुंदर कविता – कवी बबन धनावडे ३९

ललित चिंतन –

- वंद्य वंदे मातरम्– आनंद देशमुख २५

अनुभवकथन –

- अशीही एक रणरागिणी...?–कर्नल अरविंद वसंत जोगळेकर ३५

जननिष्टांची मांदियाळी –

- कविता शाहीर प्रभाकरांची–प्रा.डॉ.शशिकान्त लोखंडे २९

'अक्षरवैदर्भी' दिवाळी विशेषांक–२०१८ करिता दर्जेदार साहित्य पाठवा! ७०

दहा कविता–

माती–एकनाथ उत्तम तेलतुंबडे (१७) तू येशिल तेव्हा ये !–मीनल येवले/उत्क्रांती–प्रा.आ.य. पवार/कुणाच्याही नकळत–विलास गावडे (१८) रुमणं–रवीन्द्र जयादे (३८) एकतेचे प्रतीक–अरुणकुमार यादव/सांज–वेणा–विनय मिरासे 'अशांत' (३७) अंधश्रद्धा गाडा–प्रा.धनराज खानोरकर/ओलसावली–गोविंद मोतलग (३८) बेचैन स्पंदनां[illegible] ाहुली–वैशाली मुंगोले (६६)


लेख

# राष्ट्रसंतांचे तरुणांना आवाहन


**प्रा.कु.सुनंदा किसनराव रेवसे**

श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा (जि.बुलडाणा)


राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (१९०९-१९६८) यांचे मूळ नाव माणिक बंडोजी इंगळे-ब्रह्मभट्ट होते. पण त्यांच्या राष्ट्रव्यापी जनजागृतीच्या कार्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणूनच ते प्रसिद्धी पावले होते. भजनाच्या माध्यमातून तुकडोजींनी समाजाला विशेषतः ग्रामीण जनतेला रूढी, अंधश्रद्धा, परंपरा इत्यादीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. १९३५ सालापासून भजनांद्वारे लोकजागृतीचे झंझावाती कार्य त्यांनी हाती घेतले. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात ते सक्रिय सहभागी होते. 'ग्रामगीता' हा त्यांचा ग्रामसुधारणेवरचा आदर्श असा ग्रंथ बहुजनांचा गीतापाठ ठरला. हिन्दी आणि मराठी या दोन्ही भाषांमधून त्यांनी विपुल लेखन केले आहे.

'या भारतात बंधुभाव नित्य वसू दे' हे तुकडोजी महाराजांचे भजन म्हणजे आधुनिक भारताचे 'पयासदान'च होय. 'ज्ञानाचा एका आणि नाम्याचा तुका' असे जे म्हटले जाते ते एका वेगळ्या अर्थाने. ज्ञानेश्वर महाराजांचे उरलेले कार्य एकनाथ महाराजांनी पूर्णत्वास नेले म्हणजेच ज्ञानेश्वरांची शुद्ध संहिता तयार केली. त्या अर्थाने ते ज्ञानेश्वरीचे एकमेव पहिले संशोधक ठरतात. तद्वतच नामदेव महाराजांची कीर्तनपद्धती पुढे तुकाराम महाराजांनी विकसित केली आणि पुढे ही परंपरा संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजापर्यंत कायम राहिली. संत तुकडोजी महाराजांची सामुदायिक प्रार्थना अतिशय महत्त्वाची आहे. सर्व धर्मांचे व बहुविध संस्कृतीचे लोक एकत्र येऊन मतभेद विसरून गुण्यागोविंदाने नांदायला हवे, या एकत्र आलेल्या सर्वांनी आपापसातील मतभेद लक्षात न ठेवता एकत्रित कार्य केले तर धर्माचे आणि राष्ट्राचेही ऐक्य साधले जाईल. त्यामुळे राष्ट्राराष्ट्रात शांतीचे वातावरण राहील व लोकांमध्ये नवे विचार उदय पावतील हा त्यामागे त्यांची भूमिका होती. हे देवा, तू मला असा वर दे की येथे बंधुभाव नित्य नांदेल, माझा भारत देश त्यायोगे बलवान होईल, सुखी होईल, राष्ट्रीय एकात्मता साधल्या जाईल.

*'बुडत हे जन। न देखवे डोळा।*
*पाहुनी कळवळा। येतो जीवा।'*

अशी तत्कालीन भारताची स्थिती पाहून राष्ट्रसंतांचे मन विषण्ण झाले आणि त्यांनी देवाला

साकडे घातले. येथील विषम समाजव्यवस्था पाहून ते अस्वस्थ झाले, त्यांच्या तोंडून उत्स्फूर्तपणे भजनाच्या रूपाने परंपरेची विनवणी बाहेर पडू लागली.

*'नांदोत सुखे गरीब-अमिर एक मतानी*
*मग हिंदु असो ख्रिश्चन वा हो इस्लामी*
*स्वातंत्र्यसुखा या सकळामाजी वसू दे*
*दे वरचि असा दे।'*

आज देश स्वतंत्र होऊन सत्तर वर्षे होत आहेत. पण स्वातंत्र्याचा उपभोग अन् अर्थ किती जणांना पुरता कळला?

आज सर्व धर्मांचे सार सत्य असे समजले जाते. न्याय, समता, बंधुता यांच्या नुसत्या वल्गना उरल्या असून जातीयतेच्या नावावरच मुडदे पडताना दिसतात, धर्मनिरपेक्षतेच्या नावावर धर्मांधता, जातिहीनतेच्या नावावार जातीयता पाळली जाते. हे दृश्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना पाहवले नसेल, त्यांच्यातील जाज्वल्य राष्ट्राभिमान उफाळून आला असेल आणि म्हणूनच अगदी एकेरी शब्दांत देवाशी त्यांनी संवाद साधला असावा व संवादाचं फलित म्हणूनच आश्वासक वर मागितला असावा की-

*'हा जातिभेद विसरुनिया एक हो आम्ही*
*अस्पृष्यता समूळ नष्ट हो जगातुनी*
*खळ निंदका मनीहि सत्य न्याय वसू दे*
*दे वरचि असा दे'*

आधुनिक काव्याचे जनक केशवसुत म्हणतात, "ब्राह्मण नाही हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा" कारण 'कुपातील मी नच मंडुक'. इथे 'मी' विशाल बनतो, 'स्व' विश्वाकार बनतो. तुकडोजी महाराजांना देखील यापेक्षा वेगळे काय म्हणायचे आहे?

सद्यःस्थितीत मतामतांचा गलबलाच जाणवतो आहे. जर हे असेच चालत राहिले तर देशात काय होईल? राजकीयदृष्ट्या देश स्वतंत्र झाला पण त्याची मानसिकता त्या तुलनेत बदलली का? या देशाची धुरा ज्या तरुणांना खांद्यावर वाहून न्यायची आहे, त्यांच्यापुढे कोणता आदर्श ठेवायचा? उद्योगाच्या घरी रिद्धी-सिद्धी पाणी भरतात, चारित्र्यवान माणसाला सारे भितात. आमचा तरुण उद्योगी बनला पाहिजे, वैफल्य, निराशा त्यांच्या वाऱ्यालाही थांबू नये; तरच या भारताचे भले आहे. बंधुत्व इथे सौख्यभरे नांदले तर तरुणाला चिंताच नको.

सूर्य, वारा, धारा यांचे आदर्श जर आमच्या तरुणाने ठेवले तर चारित्र्य-बल-सौंदर्य त्यांच्या ठायीच आहे. हे देवा, या भारत देशाला अशा तऱ्हेने मला सुखी, आनंदी, समाधानी



पाहायचे आहे. एवढी माफक इच्छा कवी देवाजवळ बोलताना दिसतात.

कवीने देवाला भारतातील घराघरात स्वर्गाची शांतात व स्वर्गाचे सुख मागितले आहे. त्यासाठी कष्ट पडले तरी सोसायला ते तत्पर आहेत. संकटे, भिती, नैराश्य इथे राहूच नये; घराघरातील माणसे एका अंतःकरणाच्या नात्याने, जिव्हाळ्याने एकत्र यावीत. एका घरात राहातो म्हणून कसंतरी राहायचं, 'मनामनात वैमनस्याच्या भिंती मात्र कायम'- असं होता कामा नये. मनातील भितीच मानवी सौंदर्याला कुरूप करीत असते. मन कसं निर्भय असायला हवं. भिती माणसाला जाळून टाकते, चिंता चिता रचते. हे असं भयग्रस्त/दहशतग्रस्त जीवन जर आजच्या तरुणांच्या वाट्याला आलं तर तो स्वतःला सुरक्षित कसे बरे म्हणवील? हा तरुण सुंदर अन् सुस्थितीत पाहाण्यासाठी तरी हे देवा, येथील मनामनातील विषमतेच्या बेड्या तोडून टाक. सर्व पंथ, संप्रदायाचे लोक एकत्र येऊ दे आणि हाच वर तू मला दे- हेच या सामुदायिक प्रार्थनेचे अंतरंग.

तात्पर्य, सर्वांना जवळ आणते तीच खरी प्रार्थना. दूर नेते त्याला स्वार्थच म्हणावे. सर्व धर्म,पंथ सारखेच आहेत हे सर्वांना पटवून द्यावे, ते पूर्ण पटेपर्यंत त्यांना स्वतःच्या धर्माच्या पद्धतीने प्रार्थना करू द्यावी. खऱ्या मनापासून केलेल्या त्या प्रार्थना भिन्न-भिन्न झाल्या तरी त्या सर्वांमध्ये एकच समान तत्त्व राहील. मानवधर्मामुळे साऱ्या विश्वाचे कल्याण व्हायचे असेल आणि उन्नती, सौंदर्य आणि सुख नांदवायचे असेल तर सामुदायिक प्रार्थना हाच एकमेव उपाय आहे. ती प्रार्थना करणारा 'सामुदायिक'- म्हणजे खऱ्या अर्थाने समाजाचा घटक बनतो.

प्रस्तुत कवितेतील राष्ट्रसंत तुकडोजींच्या रोमरोमात देशभक्ती भरून राहिलेली दिसते आणि त्यांचा निखळ राष्ट्राभिमान किती उत्तुंग पातळीवरचा होता हे कळते. म्हणूनच हे राष्ट्रसंतत्व पावलेले कवी म्हणतात-

*'तुकड्यास सदा सर्वदा सेवेत कसू दे*
*दे वरचि असा दे'*

इथे भारत ही राष्ट्रवाचक संकल्पना स्वातंत्र्य चळवळीतून स्पष्ट झाली. त्यासाठी स्वतः राष्ट्रसंतांनी मौलिक योगदानही दिले. त्यातूनच भारतीय जनतेसाठी हे मागणं देवाजवळ मागायची जाणीव त्यांच्या हृदयात प्रस्फुटित झाली.

**संदर्भ ग्रंथ-**

(१) 'तरुणांचे तुकडोजी', प्रा.डॉ.राम घोडे, राजीव प्रकाशन, नागपूर. (२) 'राष्ट्रसंतांचे पत्रे', संपा.बाबा मोहोड, श्रीगुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज, जि.अमरावती. (३) 'ग्रामगीता', राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संपा. सुदाम सावरकर.

▪ ▪ ▪